**<u>अतारांकित प्रश्नोत्तरांची पाचवी यादी</u>**

# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले (अर्थसंकल्प) अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**आष्टी (जि.बीड) शहरात शासकीय कार्यालयास पाणीपुरवठा करण्याबाबत**

**(१) १७१७६ (२९-०४-२०११) श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी (जि.बीड) शहरात मोठ्या प्रमाणात शासकीय कार्यालये असून दररोज सुमारे तीन हजार कर्मचारी ये-जा करीत असताना सुध्दा तेथे पाण्याची पुरेशा प्रमाणात सोय नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०११ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर शहराला पुरेशा प्रमाणात पाण्याचा पुरवठा करणेबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-०३-२०१७) :** (१), (२), (३) व (४) आष्टी शहरास सुमारे १८ शासकीय इमारती असून त्यापैकी ८ इमारतीकरीता स्वत:च्या विंधन विहिरी आहेत. ३ इमारतींना नगरपंचायतीने स्वतंत्र नळ जोडणी दिलेली आहे. उर्वरित ७ इमारतीतील कार्यालय पाण्याची व्यवस्था त्यांच्यास्तरावर करतात.

टंचाई काळात सन २०११ नंतर टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला आहे.

सध्या नळ योजनेद्वारे पाणीपुरवठा सुरु असून शासकीय कार्यालयाने मागणी केल्यास नियमित नळ जोडण्या देण्यात येतील, असे जिल्हाधिकारी, बीड यांनी कळविले आहे.

---

**राज्यातील शाळा आणि महाविद्यालयांतुन स्काऊट गाईडचे युनिट सुरु करणेबाबत**

**(२) १८५९२ (२९-०४-२०१६) डॉ.अपूर्व हिरे : दिनांक १५ डिसेंबर, २०१५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यांत आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ५ मधील प्रश्न क्रमांक ९९९७ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रत्येक शाळा आणि महाविद्यालयातून स्काऊट गाईडचे युनिट सुरु करण्याच्या अनुषंगाने मा.राज्यपाल महोदयांनी व्यक्त केलेल्या मतानुसार, शासनस्तरावर प्रस्तुत बाबींवरील विचार पूर्ण झाला आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रभक्तीने प्रेरित पिढी निर्माण करण्याच्या हेतूने उपयुक्त प्रस्तुत प्रस्तावावर शासनाने तपासणीअंती कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(३) नसल्यास, सदरील बाबींवर शासनाचा विचार केव्हापर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे ?

**श्री. विनोद तावडे (०३-०३-२०१७) :** (१) नाही.

(२) व (३) शाळांमध्ये स्काऊट/गाईड हा विषय इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंत अनिवार्य उपक्रमांपैकी एक उपक्रम व इयत्ता ९ वी ते १० वी करीता अभ्यासक्रमात ऐच्छिक विषय म्हणून अंतर्भूत करण्यात आला आहे. महाविद्यालयात सदर युनिट सुरु करणेबाबतची बाब तपासण्यात येत आहे.

---

**यावल (जि.जळगाव) येथे उपोषणादरम्यान वृध्दाचा मृत्यू झाल्याबाबत**

**(३) १९१२७ (२८-०४-२०१६) श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यावल (जि.जळगाव) शहरातील मुख्य रस्त्यावरील आपल्या दुकानासमोरील अतिक्रमण काढण्याच्या मागणीसाठी दिवंगत देविदास भारंबे या ८० वर्षीय वृध्द व्यावसायिकाने दिनांक १३ मार्च, २००८ ते ०२ फेब्रुवारी, २०१६ पर्यंत यावल नगरपालिकेत लेखी निवेदने दिली तसेच तोंडी मागणी केली असता दिनांक ०३ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास नगरपालिकेने अतिक्रमण मोहिम राबवली, परंतु भारंबे यांनी विनंती केलेले अतिक्रमण न काढता त्यांच्याच दुकानाच्या पाय-या तोडण्यात आल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सर्व प्रकाराची धास्ती घेऊन देविदास भारंबे यांनी वृध्द पत्नी, मुलगा व सून यांचेसह नगरपालिकेसमोर दिनांक २३ फेब्रुवारी, २०१६ रोजीपासून आमरण उपोषण सुरु केले त्यातच दिनांक २३ फेब्रुवारी, २०१६ रोजी दुपारी १:३० वाजताच्या सुमारास उपोषण स्थळी त्यांचे निधन झाले त्यामुळे परिसरात तणाव निर्माण झाला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०१७) :** (१) यावल नगरपरिषदेमधील बुरुज चौक ते बोरावल गेट व बेहेडे सुपर शॉप ते न.पा.कार्यालय या रस्त्यावरील रहिवासी, व्यापारी, व्यावसायिकांनी केलेले अतिक्रमण काढण्याबाबत एक महिना मुदतीची नोटीस दिलेली होती. त्यानुसार सुमारे ६०% नागरिकांनी अतिक्रमण स्वत: काढून टाकले. श्री.भारंबे यांनी देखील त्यांचे अतिक्रमण काढून टाकले. उर्वरित ४०% अतिक्रमण नगर परिषदेने दिनांक ०३/०२/२०१६ रोजी काढले.

तक्रारदार श्री. भारंबे यांनी त्यांचे शेजारी श्री.सोनार यांचे दुकान ३ ते ४ फुट अतिक्रमण असल्याबाबत सन २००८ पासून वेळोवेळी अर्ज दिलेले आहेत. मात्र त्याबाबत सक्षम पुरावे दिलेले नाहीत व न्यायालयात दाद मागितलेली नाही. अतिक्रमणाबाबत दिलेल्या नोटीसीनुसार व तोंडी सूचनानुसार श्री.भारंबे यांनी स्वत: अतिक्रमण काढून घेतले होते.

(२) व (३) श्री.भारंबे यांचे शेजारी श्री.सोनार यांचे अतिक्रमण नगरपालिकेने काढले नाही. यास्तव दिनांक १७/०२/२०१६ रोजी उपोषणासाठी नोटीस दिली.

याबाबत दिनांक २२/०२/२०१६ नुसार तक्रार अर्जाबाबत कायदेशीर कार्यवाही करण्याचे व उपोषणापासून परावृत्त होण्याचे लेखी सूचना पत्र दिले होते. श्री.भारंबे त्यांचे परिवारासह दिनांक २३/०२/२०१६ पासून उपोषणाला बसले. श्री.भारंबे यांचे वडील श्री.देवीदास भारंबे हे वयोमानामुळे आजारी होते. उपोषणस्थळी त्यांचे वडीलांना सुमारे ११.०० ते ११.३० वा. आणल्यानंतर १.०० ते १.३० चे दरम्यान त्यांचे निधन झाले.

दिनांक २३/०२/२०१६ रोज १५ दिवसात श्री.सोनार यांचे घराची मोजणी करुन अतिक्रमण त्वरीत काढण्याचे लेखी आश्वासन श्री.पुरुषोत्तम देविदास भारंबे यांना दिले. मोजणीकामी रुपये ४८,०००/- नगरपरिषदेने भरुन मोजणी करण्यात आली. त्यानुसार श्री.सोनार व बारी यांचे अतिक्रमण निघाले नाही. श्री.भारंबे यांची तक्रार चुकीची सिध्द झाल्याचे जिल्हाधिकारी यांनी कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उस्मानाबाद (जि.उस्मानाबाद) येथील शरद पवार हायस्कुलच्या**
**मुख्याध्यापकांना झालेली मारहाण**

**(४) १९१८१ (२८-०४-२०१६) श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद (जि.उस्मानाबाद) येथील शरद पवार हायस्कूलचे मुख्याध्यापक श्री.बापू खंडागळे यांना दिनांक २६ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी घरी बोलवून बेदम मारहाण केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार पोलीस प्रशासनाने संबंधितांविरोधात चौकशी करुन कोणती कारवाई केली तसेच संबंधित शिक्षण संस्थेवर प्रशासक नियुक्त करण्याबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०२-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी उस्मानाबाद शहर पोलीस स्टेशन येथे गु.रु.क्र. २१४/२०१६ भा.दं.वि. कलम ३२३, ५०६, ३४ प्रमाणे अदखलपात्र स्वरुपाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील सर्व आरोपींविरुध्द सी.आर.पी.सी. कलम १०७ प्रमाणे प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे. तसेच, सदर संस्थेवर प्रशासक नियुक्तीबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महापालिकेच्या नवीन विकास आराखडयाबाबत**

**(५) १९६५० (१९-०८-२०१६) ॲड.अनिल परब, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या सुधारित प्रारुप विकास आराखडयात अनेक उद्याने आणि मैदानांवर मेट्रोचे जिने, स्टेशन, भुयारी मार्ग आणि कार पार्किंग प्रस्तावित करण्यात आली असून सदरहू आराखडयात उद्याने आणि मैदांनाचे आरक्षण काढून टाकण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महापालिकेच्या नवीन विकास आराखडयात ना-विकास क्षेत्रात मोकळया जागेत बांधकाम करण्याची सूट देण्यात येणार आहे त्यातील १० हजार चौरस मीटर जमीन विकासकांसाठी खुली करण्यात येणार असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त विकास आराखडयात ना विकास क्षेत्र, मिठागरे आणि ग्रीन झोनवर पुनर्विकास करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त आराखडयाबाबत शासन फेरविचार करणार आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०२-२०१७) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्रारुप विकास नियंत्रण नियमावलीसह पुनर्प्रसिध्द केलेल्या सन २०१४-३४ च्या सुधारित प्रारुप विकास आराखड्यामध्ये सन १९९१ च्या विकास आराखड्यामधील ज्या ना विकास क्षेत्राचा समावेश नैसर्गिक क्षेत्रे म्हणून करण्यात आला आहे ते क्षेत्र वगळून ना विकास क्षेत्रामधील मैदानांचे आरक्षण काढण्याचे प्रस्तावित केलेले आहे. तथापि प्रसिध्द प्रारुप विकास नियंत्रण नियमावलीमध्ये अशा ना विकास क्षेत्राचा विकास करताना ठराविक क्षेत्र मोकळ्या जागांसाठी ठेवण्याची तरतूद देखील प्रस्तावित केली आहे.

(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेने पुनर्प्रसिध्द केलेल्या सुधारित प्रारुप विकास योजना अहवालामध्ये ना विकास क्षेत्रामधील ३००० हेक्टर जागा ना विकास क्षेत्रासाठी उपलब्ध असलेल्या तरतूदीनुसार उपलब्ध होवू शकेल असे प्रस्तावित करणेत आलेले आहे. तथापि, त्याकरिता भूखंड क्षेत्राची अट किमान ४.०० हेक्टर इतकी प्रस्तावित करणेत आलेली आहे. तसेच त्यामधील २५ टक्के जागा सार्वजनिक मोकळ्या जागा म्हणून तसेच संस्थात्मक क्षेत्र ८ टक्के, सामाजिक सुविधा क्षेत्र ८ टक्के, सर्वसमावेशक गृहनिर्माणासाठी २५ टक्के व जमीन मालकास विकासासाठी ३४ टक्के याप्रमाणे विकास करण्याबाबत बंधनात्मक तरतूदी प्रस्तावित करणेत आलेल्या आहेत.

(४) व (५) सदरचा आराखडा हा प्रारुप आराखडा असून बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून नागरिकांच्या सूचना/हरकतीसाठी प्रसिध्द करणेत आलेला आहे. प्राप्त सूचना/हरकती विचारात घेवून वैधानिक कार्यवाही पूर्ण होवून आराखडा महानगरपालिकेकडून शासनाचे मान्यतेसाठी सादर झाल्यानंतर गुणवत्तेनुसार या प्रकरणी शासनाकडून अंतिम निर्णय संकल्पित राहणार आहे.

---

**मुंबई येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(६) १९७७१ (२३-०८-२०१६) श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.प्रकाश गजभिये, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.रामराव वडकुते, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग, श्री.सुनिल तटकरे, श्री.अनिल भोसले, ॲड.अनिल परब, श्री.रामहरी रुपनवर, ॲड.जयदेव गायकवाड, ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक १६२६३ ला दिनांक २३ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील इंदू मिलच्या जागेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचे भूमीपूजन मा.पंतप्रधान यांचे हस्ते गतवर्षी करण्यात आले मात्र अद्याप सदर जमीन शासनाच्या ताब्यात मिळालेली नाही, हे खरे आहे काय

(२) असल्यास, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती निमित्त दिनांक १४ एप्रिल, २०१६ रोजी स्मारकाच्या कामास सुरूवात होईल अशी अपेक्षा असताना प्रत्यक्षात जमीन ताब्यात आलेली नसल्याने स्मारकाचे काम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर इंदू मिलची जागा ताब्यात घेऊन उक्त स्मारकाचे काम सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०२-२०१७) :** (१) इंदू मिलची जागा भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रस्तावित स्मारकासाठी राज्य शासनास हस्तांतरण करणेस केंद्र शासनाने मंजूरी दिलेली आहे. याबाबत मा.वस्त्रोद्योग मंत्री, भारत सरकार यांनी दिनांक ५/९/२०१६ रोजीचे पत्रान्वये राज्य शासनास कळविलेले आहे. त्याप्रमाणे सदरची जागा ताब्यात देणे व घेणेच्या अनुषंगाने राष्ट्रीय वस्त्रोद्योग महामंडळ व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास दिनांक २१/११/२०१६ रोजीचे पत्रान्वये राज्य शासनाकडून सूचना देणेत आलेल्या आहेत.

(२) सदर जागेवर काम करण्याची परवानगी आहे. मुंबई महानगर विकास प्राधिकरणाकडून सदर जागेवरील जुनी बांधकामे पाडून टाकण्यात येत आहेत.

(३) व (४) सर्व संबंधित व्यक्ती आणि संस्था यांचेशी चर्चा करुन प्रस्तावित स्मारकाचा आराखडा अंतिम करण्यासाठी मा.मंत्री (सामाजिक न्याय) यांचे अध्यक्षतेखाली नियुक्ती करणेत आलेल्या एक सदस्यीय समितीने प्रस्तावित स्मारकाचे संकल्पना आराखडे अंतिम केलेले आहेत. त्यानुषंगाने आता पुढील कार्यवाही संकल्पित आहे.

---

**मुंबईतील मालाड (पश्चिम) येथील लोटस तलावाचे संवर्धन करण्याबाबत**

**(७) १९८१४ (२३-०८-२०१६) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मालाड (पश्चिम) येथील आगरी कोळी बांधवांचा श्रध्दास्थान म्हणून ओळखला जाणारा प्राचीन काळातील लोटस तलाव दुर्लक्षित होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तलावाच्या सुशोभिकरणासाठी महापालिकेकडून ३ कोटी रुपयांचा निधी मंजूर घेऊनही काम सुरु झाले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तलावासाठी सुरक्षा रक्षक नसल्याने रात्रीच्या वेळी मद्यपींच्या पाटर्यांचा तेथील नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून सदर तलावाच्या संवर्धनासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) सदर तलावाच्या नुतनीकरणासाठी अंदाजित खर्च रुपये ८ कोटी इतका असल्याकारणाने सदर काम बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उद्यान कक्ष विभागामार्फत प्रस्तावित करण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही.

या ठिकाणी लोकांच्या पार्ट्यांबाबत या नागरिकांना त्रास होत असल्याबाबत महानगरपालिकेस तक्रार प्राप्त झालेली नाही.

(४) तलावाच्या संवर्धनासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उद्यान कक्ष विभागामार्फत पुढील काम करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**एकरुख उपसा सिंचन योजनेसाठी (जि.सोलापूर) दिलेल्या जमिनीचा मोबदला देण्याबाबत**

**(८) २०३१९ (१९-०८-२०१६) श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर येथे जिल्हा लोक न्यायालयाचा निकाल होऊन चार वर्षे झाली तरीही एकरुख उपसा सिंचन योजनेसाठी जमिनी दिलेल्या शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला अद्याप मिळाला नसल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०२-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) मागील चार वर्षात एकरुख उपसा सिंचन योजनेकरीता संपादन केलेल्या भूसंपादन प्रकरणात (भूसंदर्भात) लोक अदालत मध्ये ठेवून तडजोडीने निकाली काढण्यात आलेल्या भूसंदर्भात न्यायालयाचे निकालाप्रमाणे मुद्दल व व्याजासह एकूण ६८ प्रकरणात संबंधित संपादन मंडळ, कार्यकारी अभियंता, उजनी कालवा विभाग क्र. ८, सोलापूर यांचेकडून अनुदान रकमेचे रुपये १,५६,४४,७११/- एवढ्या रकमचे अनुदान प्राप्त करुन घेऊन मा.जिल्हा न्यायालयात जमा करण्यात आलेले आहे. तडजोडीने निर्णय झालेल्या सर्व भूसंदर्भात परिगणना तक्ता तयार करुन देण्यात आलेला आहे. न्याय निर्णय झालेल्या सर्व प्रकरणात न्याय निर्णयाप्रमाणे मुद्दल व व्याजासह रक्कम मा.न्यायालयात जमा करण्यात आलेली आहे.

---

**साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे विकास महामंडळातील नोकर भरतीत गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(९) २०५२८ (१९-०८-२०१६) श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.शरद खलिफे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे विकास महामंडळात पदे मंजूर अथवा रिक्त नसताना व नोकरभरतीची कोणतीही प्रक्रिया न राबविता सन २०१२-१३ मध्ये गैरमार्गाने भरती केलेल्या ७० पैकी १९ कर्मचाऱ्यांना व्यवस्थापकीय संचालकांनी सेवेतून निलंबित केले असून उर्वरित ५१ कर्मचाऱ्यांवरही निलंबनाची कार्यवाही होणार असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने चौकशी करुन उर्वरित ५१ कर्मचाऱ्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१८-०२-२०१७) :** (१) होय.

(२) व (३) सन २०१२-२०१५ या कालावधीत तत्कालीन अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी एकूण ७६ कर्मचाऱ्यांची भरती केली असून अद्यापपर्यंत त्यापैकी एकूण ३७ कर्मचाऱ्यांना निलंबित केले आहे. उर्वरित पैकी २३ कर्मचारी विविध न्यायालयात गेले असून प्रकरण न्याप्रविष्ठ आहे. उर्वरित १६ कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याचे प्रस्तावित आहे.

---

**राज्यातील टोलमुक्त रस्ते व रेल्वे फाटकावर उड्डाणपुल बांधण्याबाबत**

**(१०) २०८५१ (१९-०८-२०१६). श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात साडेतीन वर्षात लहान वाहनाना टोलमुक्त असलेले २१ हजार कि.मी. चे रस्ते तसेच सर्व रेल्वे फाटकांवर उड्डाणपुल बांधण्याचा निर्णय शासनाने माहे एप्रिल, २०१६ च्या पहिल्या आठवडयात घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निर्णयाचे स्वरुप काय आहे, सदर निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी किती निधीची आवश्यकता आहे, प्रत्यक्षात केव्हा व किती निधी उपलब्ध करण्यात आला आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०२-२०१७) :** (१) सन २०१६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात दिनांक ६ एप्रिल, २०१६ रोजी सभागृहात झालेला चर्चेच्या वेळी मा.मंत्री (सा.बां.) यांनी खालीलप्रमाणे घोषणा केली आहे.

(अ) येत्या तीन वर्षात महाराष्ट्रातील सर्व रेल्वे ट्रॅकच्या ठिकाणी आरओबी असतील.

(ब) २१ हजार किलोमीटरचे रस्ते ॲन्युईटीतून करण्याची बाब प्राध्यान्याने करणार आहोत.

(२) व (३) प्रस्तुत प्रकरणाची वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे.

(अ) हायब्रीड ॲन्युईटी कार्यक्रमांतर्गत सुमारे १०,००० कि.मी. लांबीच्या रस्त्यांची सुधारणा करण्याचे नियोजित असून डिसेंबर, २०१६ मध्ये हायब्रीड ॲन्युईटी कार्यक्रमांतर्गत रुपये ३०,०००/- कोटी अंदाजित किंमतीची १९५ रस्तांची कामे अर्थसंकल्पीत करण्यात आली आहेत.

(ब) राज्यातील ज्या ठिकाणी रेल्वे क्रॉसिंगवरील वाहतूक वर्दळ १ लाख TVU पेक्षा जास्त आहे, अशा ठिकाणी रेल्वे उड्डाणपुलाकरीता रुपये ५३४१.२४ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनास पाठविण्यात आला आहे.

---

### लोअर परेल (मुंबई) येथील जुन्या इमारतीचा पुनर्विकास करताना अनेक विकासकांनी कोणत्याही नियमावलीचे पालन न केल्याबाबत

**(११) २१३६८ (२३-०८-२०१६) ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जुन्या इमारतींचा पुनर्विकास करताना रस्त्याच्या रुंदीकरणासाठी ४.५ मीटर जागा सोडणे विकासकांना बंधनकारक करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लोअर परेल (मुंबई) येथील शंकरराव नराम मार्गावरील श्रीनिवास या जुन्या इमारतीचा पुनर्विकास करताना अनेक विकासकांनी नियमावलीचे पालन केले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन संबंधित विकासकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०२-२०१७) :** (१) अशी बाब नाही.

मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ अंतर्गत प्रस्तावित केलेल्या रस्त्याच्या रेषेने एखाद्या भूखंडावरील क्षेत्र बाधित होत असेल तर असे क्षेत्र बृहन्मुंबई महानगरपालिकेस हस्तांतर करणे आवश्यक आहे.

(२) श्रीनिवास मिल येथील चाळींच्या पुनर्विकासासाठीच्या इमारतीसमोर शंकरराव नराम मार्ग १३.४० मी. रस्त्याच्या रेषेने बाधित होत आहे. त्याप्रमाणे रस्त्याच्या रेषेने बाधित होणारे क्षेत्र सोडले असून नियमानुसार ४.५ मीटर मोकळी जागा सोडली आहे. सदर इमारतीस मुख्य अग्निशमन अधिकारी यांनी ना-हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. तसेच भोगवटा प्रमाणपत्रही देण्यात आलेले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### तंत्र माध्यमिक विद्यालय व किमान कौशल्य (एमसीव्हीसी) अभ्यासक्रमातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची सेवा सर्व प्रयोजनांसाठी ग्राह्य धरणेबाबत

**(१२) २२००१ (२४-०८-२०१६) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.हेमंत टकले, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कौशल्य विकास व उद्योजकता विभागांतर्गत तंत्र माध्यमिक विद्यालयातील व किमान कौशल्य (एमसीव्हीसी) अभ्यासक्रमातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, निदेशक, पूर्णवेळ शिक्षक यांची मान्यता प्राप्त सेवा सर्व प्रयोजनांसाठी ग्राह्य धरली जात नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुरुवातीला शैक्षणिक वर्षासाठी मान्यता दिलेल्या कर्मचाऱ्यांची मान्यता प्राप्त सेवा १२ वर्षाच्या वरिष्ठ श्रेणीसाठी व वेतन निश्चितीसाठी ग्राह्य न धरण्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच, या सर्व कर्मचाऱ्यांना व शाळांना महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी सेवा शर्ती अधिनियम, १९७७ व नियमावली १९८१ मधील सर्व तरतुदी लागू आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शालेय शिक्षण विभागाप्रमाणे या कर्मचाऱ्यांची कायम रिक्त पदावरील तात्पुरती मान्यता प्राप्त सेवा सर्व प्रयोजनासाठी ग्राह्य धरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०६-०३-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अर्हताधारण न करता शैक्षणिक वर्षासाठी मान्यता दिली असेल तर अशी सेवा वरिष्ठ वेतनश्रेणीसाठी व निवड वेतनश्रेणीसाठी ग्राह्य धरली जात नाही. परंतु अर्हताधारण केलेली शैक्षणिक वर्षाची मान्यता वरीष्ठ वेतनश्रेणीसाठी व निवड वेतनश्रेणसाठी ग्राह्य धरली जाते.
(३) होय.
(४) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयातंर्गत अनुदानित संस्थामधील रिक्त असलेल्या पदांवर नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांस सत्रापुरती मान्यता दिली जाते. तथापि सदर सेवा ही कोणत्याही सेवाविषयक लाभासाठी ग्राह्य धरली जात नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील अनुदानास पात्र शाळांच्या अनुदानाबाबत

**(१३) २२१२५ (२३-०८-२०१६) श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अनुदानास पात्र म्हणून माहे जून, २०१६ अखेर शासन आदेश निर्गमित केलेल्या प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांची व वर्ग तुकड्यांची जिल्हानिहाय संख्या किती आहे,
(२) पात्र ठरलेल्या शाळा, कनिष्ठ महाविद्यालय व वर्ग तुकड्यांना २० टक्के प्रमाण अनुदान देण्याबाबत मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयाचे नेमके स्वरुप काय आहे,
(३) अनुदानास पात्र ठरलेल्या परंतु अजून शासन आदेश निर्गमित न झालेल्या प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांची व वर्ग तुकड्यांची संख्या किती आहे व त्यांचा शासन आदेश केव्हा निर्गमित होणार आहेत,
(४) अनुदान पात्र शाळा, कनिष्ठ महाविद्यालय व वर्ग तुकड्यांवरील शिक्षक-कर्मचाऱ्यांचे वेतन सुरु करण्याबाबत शासन आदेश निर्गमित केला आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०५-०३-२०१७) :** (१) माहे जून, २०१६ अखेर १६२८ शाळा व त्यावरील २४५२ तुकडयांना अनुदानास पात्र घोषित करण्यात आले आहे.

(२) शासन निर्णय दिनांक १९ सप्टेंबर, २०१६ नुसार १४ जून, २०१६ पूर्वी अनुदानास पात्र घोषित करण्यात आलेल्या शाळा व वर्ग तुकडयांना सरसकट २० टक्के प्रमाणे अनुदान उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

(३) उर्वरीत अनुदान पात्र शाळांना अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत सकारात्मक कार्यवाही सुरु आहे.

(४) शासन निर्णय दिनांक १ फेब्रुवारी, २०१७ अन्वये अनुदान पात्र शाळांना २० टक्के प्रमाणे अनुदान उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर येथील मेयो वैद्यकीय महाविद्यालय व डागा रुग्णालयातील पिण्याची पाण्याची समस्या सोडविण्याबाबत**

**(१४) २२३४० (२३-०८-२०१६) प्रा.अनिल सोले : तारांकित प्रश्न क्रमांक १८३०२ ला दिनांक १३ एप्रिल, २०१३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील मेयो वैद्यकीय महाविद्यालय व डागा रुग्णालयातील रुग्ण व डॉक्टरांना पिण्याची पाण्याची टंचाईमुळे बाहेरुन पाणी विकत घ्यावे लागत असल्याने रुग्णांना आर्थिक अडचणीचा सामना करावा लागत असल्याचे दिनांक ३० मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयातील पिण्याची पाण्याची समस्या सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१७) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) (अ) इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (मेयो रुग्णालय) रुग्णालयाने जास्तीचा पाणीपुरवठा करण्याबाबत दिनांक ०३/०८/२०१३ व दिनांक ३१/०८/२०१३ अन्वये महापालिकेस करण्यात आलेल्या विनंतीनुसार, महापालिका हद्दीत पाणीपुरवठा करणाऱ्या मे.ओ.सी.डब्ल्यू.पी.एल. कंपनीकडून करण्यात आलेल्या पाहणीअंती, रुग्णालयाच्या आंतरिक जलवाहिन्या अत्यंत जीर्ण असल्याची, पाण्याची गळती होत असल्याची शक्यता असल्याचे, तसेच रुग्णालयाकडे पाणी साठवूणकीची शक्यता असण्याची आवश्यकता अहवालाद्वारे नमूद केली होती.

त्यानुसार, या प्रकरणी दिनांक ०५/०९/२०१५ रोजी रुग्णालयासमवेत झालेल्या बैठकीमध्ये, उपरोक्तप्रमाणे नमूद उपाययोजना करण्याबाबत रुग्णालयास सांगण्यात आले. असे असले तरी, उन्हाळ्यात या रुग्णालयास सुमारे ०.९४ दशलक्ष लिटर्स प्रतिदिन पाणीपुरवठा करण्यात आला असून, उक्त उपाययोजना केल्यास सद्य:स्थितीत एवढे पाणी पुरेसे असल्याचे आढळून आले आहे.

(ब) डागा स्मृती शासकीय स्त्री रुग्णालयाच्या मागणीनुसार पाणीपुरवठ्यात वाढ करुन ती सध्या ०.२० दशलक्ष लिटर्स प्रतिदिन ते ०.२३ दशलक्ष लिटर्स प्रतिदिन पाणीपुरवठा करण्यात आलेला आहे.

त्यानंतर, पुन्हा रुग्णालयाने केलेल्या विनंतीनुसार वाढीव पाणीपुरवठा करण्यासाठी पाण्याचे नियोजन करण्यात येत असल्याचे, आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांच्या अहवालात नमूद करण्यात आलेले आहे.

---

**वसई-विरार महानगरपालिकेने स्वामित्वधनापोटी वसूल केलेली रक्कम शासनखाती जमा न केल्याबाबत**

**(१५) २२५६८ (१६-०८-२०१६) श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, अॅड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार महानगरपालिकेने सन २०१३-१४ या वित्तीय वर्षात आपल्या विविध ठेकेदारांकडून स्वामित्वधनापोटी वसूल केलेली रक्कम रुपये १२ लाख ३४ हजार १८४ शासनाच्या महसुल विभागाकडे भरणा केली नसल्याची तक्रार दिनांक ५ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास एका सविस्तर निवेदनाद्वारे मा.महसुल मंत्री यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार महानगरपालिकेने ठेकेदारांकडून वसुल केलेली स्वामित्वधनाची रक्कम शासनखाती जमा करण्याबाबत तसेच, उपरोक्त प्रकरणी दोषी अधिकारी/कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०२-२०१७) :** (१) अशा आशयाचे दिनांक ५ मे, २०१६ रोजीचे निवेदन प्रधान सचिव (महसूल) यांना प्राप्त झाले आहे.

(२) वसई-विरार शहर महानगरपालिकेने विविध ठेकेदारांकडून स्वामित्वधनापोटी वसूली केलेली रक्कम रुपये १२,३४,७९४/- दिनांक २२/०९/२०१६ व दिनांक ०७/१०/२०१६ रोजी शासन जमा केली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शिवाजी विद्यालय (ता.कराड, जि.सातारा) येथील शिक्षकांचा आर्थिक छळ होत असल्याबाबत**

**(१६) २२७२१ (२३-०८-२०१६). श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवाजी विद्यालय (ता.कराड, जि.सातारा) येथील मुख्याध्यापक श्री.बाळकृष्ण इंगवले हे दिनांक ३१ मे, २०१४ रोजी सेवानिवृत्त झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांचे सेवानिवृत्ती प्रकरण संस्थेच्या सचिवांनी अजूनपर्यंत शिक्षणाधिकारी यांचेकडे पाठविले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, सदर संस्थेचे सचिव कर्मचाऱ्यांकडून पैशाची मागणी करतात, जातीवाचक घाणेरड्या शिव्या देतात व पदोपदी अपमान करतात अशी तक्रार शासनास प्राप्त झाली आहे काय,
(४) असल्यास, श्री.इंगवले व अन्य शिक्षकांच्या संदर्भातील तक्रारीबाबत शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (०३-०३-२०१७) :** (१) होय.
(२) नाही. सेवानिवृत्ती वतन प्रस्ताव मंजूर करण्यात आलेला आहे.
(३) नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील विटभट्टी कामगारांसाठी विविध कामगार योजना लागू करण्याबाबत**

**(१७) २३०४९ (२३-०८-२०१६) श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विटभट्टी कामगारांसाठी किमान वेतन लागू करण्याबाबत शासन निर्णय घेणार आहे काय,
(२) असल्यास, सदर कामगारांसाठी प्राधान्याने विविध कामगार योजना लागू करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,
(३) तसेच, प्रायोगिक तत्वावर सुरु करण्यात आलेला विटभट्टी शाळा प्रयोग राज्यभर सुरु केव्हा करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०५-०३-२०१७) :** (१) महाराष्ट्र शासनाने विटभट्टी कामगारांसाठी दिनांक २१/१०/१९६६ रोजीच्या अधिसूचनेद्वारे “विटा व कौलांच्या (टेराकोटाच्या किंवा मातीच्या) कारखान्यामधील कामधंदा” या अनुसूचित रोजगारांकरीता किमान वेतनाचे दर निश्चित केलेले असून दिनांक ७/६/२०१६ रोजीच्या अधिसूचनेद्वारे ते पुन:र्निधारित केले आहेत. तसेच सदर अनुसूचित उद्योगाकरीता दर सहा महिन्यांनी विशेष भत्ता जाहीर करण्यात येतो.
(२) राज्यातील विटभट्टी कामगारांना इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे “बांधकाम कामगार” म्हणून नोंदीत करुन त्यांना मंडळाच्या बांधकाम कामगारांसाठी असलेल्या योजनांचा लाभ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(३) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ नुसार विद्यार्थ्यांसाठी पर्यायी शिक्षणाची व्यवस्था न करता त्यांचे इयत्ता पहिली ते आठवीचे शिक्षण नियमित शाळेत होणे आवश्यक आहे. त्यामुळे, विटभट्टी शाळा सुरु न करता विटभट्टी कामारांच्या मुलांना नियमित शाळेत दाखल करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई मेट्रो लाईन तीन या प्रकल्पाबाबत**

**(१८) २३५१७ (०४-०१-२०१७) श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्री.आनंद ठाकूर, श्री.रामराव वडकुते, श्री.सतिश चव्हाण, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई मेट्रो लाईन तीन या प्रकल्पाच्या उभारणीकरीता कुलाबा-वांद्रे, सीप्झ मार्गिकेवरील मोकळया आणि बांधकाम असलेल्या जागा मुंबई मेट्रो रेल्वे मंडळाकडे वर्ग करण्याचा निर्णय शासनाने माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आतापर्यंत किती मोकळया व बांधकामाच्या जागा मुंबई मेट्रो रेल्वे मंडळाकडे वर्ग करण्यात आल्या आहेत, तसेच उर्वरित जागा किती कालावधीत वर्ग करण्यात येणार आहेत,

(३) असल्यास, सदर मेट्रो लाईन तीन या प्रकल्पाच्या कामास निश्चित केव्हा सुरुवात करण्यात येणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१७) :** (१) होय.

(२) मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड यांना मुंबई मेट्रो लाईन-३ या प्रकल्पासाठी तात्पुरत्या स्वरुपात १७ भूभाग व कायम स्वरुपात २४ भूभाग हस्तांतरीत करण्याबाबत शासनाने निदेश दिलले आहेत.

(३) मुंबई मेट्रो लाईन-३ या प्रकल्पाच्या प्रत्यक्ष कामास सुरुवात झाली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबई महानगरपालिकेच्या शैक्षणिक साहित्य वाटपात झालेला गैरव्यवहार**

**(१९) २३५२६ (०४-०१-२०१७) श्री.जयंत पाटील, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई महानगरपालिकेने शैक्षणिक साहित्य खरेदीचे कंत्राट कोणत्या कंत्राटदाराला दिले आहे,

(२) असल्यास, शैक्षणिक साहित्य खरेदीच्या कंत्राटाची देयके दुसऱ्याच्या नावावर काढण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शैक्षणिक साहित्य खरेदीत झालेल्या गैरव्यवहाराबाबत दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०२-२०१७) :** (१) नवी मुंबई महानगरपालिकेकडून विविध शैक्षणिक साहित्याच्या खरेदीचे कंत्राट पुढील ठेकेदारांना देण्यात आले आहे.

(i) मे.रेडस्टार, वाशी, नवी मुंबई,
(ii) मे.ललानी सुल्झफॅब प्रा.लि., राजस्थान,
(iii) मे.मफतलाल इंडस्ट्रीज लिमिटेड, अंधेरी, मुबई,
(iv) मे.किंग्ज, दहिसर, मुंबई,
(v) मे.गोयल क्रिएशन्स प्रा.लि., काळबादेवी, मुंबई,
(vi) मे.अमरदिप उद्योग, वडाळा, मुंबई,

(२) हे खरे नाही,
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाच्या भरतीत गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(२०) २३५३१ (१६-१२-२०१६) श्री.जयंत पाटील, श्री.शरद रणपिसे : तारांकित प्रश्न क्रमांक २१२८१ ला २२ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या सदंर्भात** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाकडून माहे ऑगस्ट, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान ५८४ विविध पदांसाठी भरती प्रक्रिया राबविण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भरती प्रक्रिया मान्यता प्राप्त संस्थेकडून न राबविता कुणाल आयटी, पुणे या खाजगी संस्थेकडून राबविण्यात आल्याने कोटयवधी रूपयांचा गैरव्यवहार झाला असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०२-०३-२०१७) :** (१) हे खरे आहे, सहकारी आदिवासी विकास महामंडळातील रिक्त पदे भरण्याकरिता सन २०१४ मध्ये भरती प्रक्रिया राबविण्यात आली होती.

(२) अंशत: खरे आहे. आदिवासी विकास महामंडळातील रिक्त पदे भरण्याकरिता निविदा प्रक्रिया पुर्ण करण्यात आली. सदर निविदा प्रक्रियेतून अंतिम झालेल्या कुणाल आयटी, पुणे या संस्थेसोबत करार करण्यात आला. यामध्ये आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे प्रथम दर्शनी दिसून येत नाही.

(३) प्रस्तुत प्रकरणी मा.विभागीय आयुक्त, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समितीमार्फत सखोल चौकशीचे आदेश देण्यात आले होते. त्यानुसार, विभागीय आयुक्त, नाशिक यांनी आपला चौकशी अहवाल नुकताच शासनास सादर केला आहे. सद्य:स्थितीत प्रस्तुत चौकशी अहवालाची तपासणी विभागाच्या स्तरावर सुरु असून, सदर अहवाल लवकरात लवकर शासनास निर्णयार्थ सादर करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबई येथील अरबी समुद्रात शिवस्मारक उभारण्याबाबत

**(२१) २३५३९ (३०-१२-२०१६) श्री.संजय दत्त, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर : दिनांक ९ डिसेंबर, २०१६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ५ मधील प्रश्न क्रमांक १९५३५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई नजिक अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराज यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्यासाठी सुकाणू समिती नेमलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्मारक उभारण्यासंदर्भात नेमण्यात आलेल्या समितीने सादर केलेला आराखडा आणि संकल्पनेला शासनाने मंजुरी दिली असूनही या स्मारकाचा आराखडा व संकल्पनेची मंजूरी मुंबई महापालिकेत मागील सहा महिन्यांपासून प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून महानगरपालिकेकडून स्मारकाच्या आराखडास मंजूरी मिळवून शिवस्मारक उभारण्याबाबत आवश्यक असलेली कामे मार्गी लावण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०३-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकल्पाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रकल्पाचे सविस्तर आराखडे हे महानगरपालिका/सक्षम प्राधिकरण यांचेकडे मान्यतेकरीता सादर करण्यात येतील.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अशासकीय तंत्र विद्यालयातील निदेशकांना वरिष्ठ वेतनश्रेणी लागु करण्याबाबत

**(२२) २३६२८ (०४-०१-२०१७) ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक १४९७७ ला दिनांक १६ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अशासकीय तंत्र विद्यालयातील १२ वर्षे सेवा पुर्ण झालेल्या निदेशकांनी तसेच तेरणा विद्यालय नेरुळ, नवी मुंबई येथील निदेशक श्री. यु.एस.राऊत यांनी वरिष्ठ वेतनश्रेणी लागू करावी अशी सन २०१३ पासून आजतागायत शासनाकडे वेळोवेळी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निदेशकांना वरिष्ठ वेतनश्रेणीसाठी त्यांचा नियुक्ती दिनांक ग्राह्य न धरता त्यांच्या संस्थेस १०० टक्के अनुदान प्राप्त झाल्याचा दिनांकापासूनचा कालावधी ग्राह्य धरण्याच्या अटीवर संबंधित निदेशकांचे मागणी प्रस्ताव शासनाकडून अमान्य करण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सेवेत सलग १२ वर्षे सेवा ग्राह्य झालेल्या कर्मचाऱ्यांना वरिष्ठ वेतनश्रेणी लागू करण्याचा शासनाच्या शालेय शिक्षण विभागाचा धोरणात्मक निर्णय घेतलेला असताना तंत्रशिक्षण विभागाने मात्र त्या प्रकरणी नकारात्मक निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शालेय शिक्षण विभागाच्या धर्तीवर याप्रकरणी तंत्रशिक्षण विभागाने फेर निर्णय घ्यावा अशा आशयाचे निवेदन-पत्र लोकप्रतिनिधी यांनी तत्कालिन मा.उच्च व तंत्रशिक्षण मंत्री व विद्यमान मा.उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांना सन २०१४ मध्ये दिनांक २३ मार्च, २०१५ व माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान अनेकदा सादर केली असून याप्रकरणी मा.मंत्री स्तरावर तसेच अधिकारी स्तरावर बैठका होऊन सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासित करुनही या प्रकरणी शासनाने कोणतीही कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत व त्याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०६-०३-२०१७) :** (१) ते (५) सदर प्रकरणी लोकप्रतिनिधी व विविध संघटना यांची निवेदने शासनास प्राप्त झालेली आहेत. त्यानुषंगाने व्यवसाय शिक्षण संचालनालयांतर्गत असणाऱ्या अशासकीय अनुदानातील संस्थांतील निदेशक, सहा. अधिव्याख्याता, शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी खाजगी विनानुदानित काळात केलेली सेवा वरिष्ठ/निवडश्रेणी तसेच कालबध्द पदोन्नतीसाठी ग्राह्य धरण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

---

## मुंबई येथे समुद्राचे खारे पाणी पिण्या योग्य करण्यासाठी निक्षारिकरण (Desalination Project) प्रकल्प सुरु करणेबाबत

**(२३) २३६७२ (०४-०१-२०१७) डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पेयजल संकटाची वाढती व्याप्ती व दुष्काळाची तीव्रता यामुळे आगामी काळात पाण्यावरून शहरी व ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात वाद निर्माण होण्याची शक्यता विचारात घेता चेन्नई येथील प्रकल्पाप्रमाणे मुंबई येथेही समुद्रातील खाऱ्या पाण्यावर प्रक्रिया करून ते पाणी वापरण्यायोग्य करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पश्चिमवाहिनी, नारपार, अंबिका आणि औरंगा नदी नद्याजोड प्रकल्पातुन गिरणा खोऱ्यात पाणी सोडणे खर्चिक असल्याने मुंबईला दिले जाणारे वैतरणा नदीचे पाणी तुटीच्या काळात गोदावरी खोऱ्यात वळविणे आणि मुंबई शहराला पिण्यासाठी समुद्राचे खारे पाणी गोड करून पुरविणे ही काळाची गरज झालेली असल्याचे शासनाचे निदर्शनास आले आहे काय,
(३) असल्यास, अत्याधुनिक तंत्रज्ञानाने वाया जाणा-या पाण्याचा पुर्नवापर आणि उपलब्ध स्त्रोताचा टंचाईचे स्थितीत पुरेपुर वापर करून घेणे, दुष्काळ व पिण्याच्या पाण्याच्या टंचाईच्या स्थितीत अनिवार्य ठरले आहे, त्यानुषंगाने शासनाने मुंबई येथे समुद्राचे खारे पाणी गोड करण्यासाठी निक्षारीकरण प्रकल्प अहवाल तयार करण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मुंबईच्या भाभा अणू संशोधन केंद्रातील शास्त्रज्ञांनी समुद्रजल शुध्द करण्याचे संशोधन केले असून अणूभट्टीतील निरुपयोगी बाष्पाचा वापर करून दररोज ६३ लाख लिटर दुषित पाणी शुध्द करता येऊ शकेल असा दावा शास्त्रज्ञांनी केला असल्याचे दिनांक ७ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, पेयजलाचे दिवसेंदिवस अत्यंत गंभीर होत चाललेल्या संकटाचे पार्श्वभुमीवर टंचाई निवारण कालावधीत टँकर, रेल्वे इत्यादी महागड्या व तात्पुरत्या उपायांपेक्षा चेन्नई येथील प्रकल्पाच्या धर्तीवर समुद्राचे खारे पाणी गोड करण्याचा अत्यल्प खर्च असलेला निक्षारीकरण प्रकल्प उभारणेबाबत शासनाचे धोरण काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१७) :** (१) समुद्राच्या पाण्याचे नि:क्षारीकरण करण्यासाठी प्रभावी उपाययोजना व प्रकल्प राबविण्याच्या दृष्टीने सर्व संबंधित बाबींचा अभ्यास केल्यावर असे निदर्शनास आले की, ही प्रक्रिया अत्यंत खर्चिक तसेच जास्त व अखंड विजपुरवठ्याच्या गरजेवर अवलंबून आहे. मुंबईत पाण्याची गरज लक्षात घेता नि:क्षारीकरणाने उपलब्ध होणारे पाणी नगण्य असणार आहे. त्यामुळे महानगरपालिकेने नि:क्षारीकरण प्रकल्प न राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वाकोला (मुंबई) येथील शास्त्रीनगर उर्दू माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थीनीशी गैरवर्तन केल्याबाबत**

**(२४) २३६९२ (०४-०१-२०१७) श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाकोला (मुंबई) येथील शास्त्रीनगर उर्दू शाळेतील शिक्षकाने विद्यार्थीनीशी गैरवर्तन केल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाणे चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार गैरवर्तन करणाऱ्या शिक्षकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०१७) :** (१) होय.

(२) वाकोला पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र. ३६४/२०१६ कलम ३५४, ५०६, ३४ भादंवि सह ८, १२ पोक्सो ॲक्ट २०१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. आरोपी शिक्षकाचा शोध सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोस्टल मार्गाच्या मान्यतेबाबत**

**(२५) २३७२३ (०४-०१-२०१७) श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नरिमन पॉईंट ते कांदिवली दरम्यानच्या ३३ कि.मी. लांबीच्या सागरी मार्गाला महाराष्ट्र सागरी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाने भू-तांत्रिक सर्वेक्षणाला माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कोस्टल मार्गाला किती खर्च येणार आहे व या कामास केव्हा सुरुवात करण्यात येणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०२-२०१७) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्रस्तावित सागरी मार्गाची प्रिन्सेंस स्ट्रीट फ्लायओव्हर ते वरळी (end of Sea Link) भाग-अे व बांद्रा (end of Sea Link) ते कांदिवली जंक्शन लिंक रोड भाग-बी या दोन भागामध्ये विभागणी केलेली असून सागरी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणाने (MCZMA) त्यांच्या दिनांक २ व ३ नोव्हेंबर, २०१६ रोजी झालेल्या ११४ व्या बैठकीमध्ये वरील भाग-अे पर्यंतच्या सागरी मार्गावर भूतांत्रिक सर्वेक्षण करण्यासाठी परवानगी दिली आहे.

(२) व (३) या प्रकरणी विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या सल्लागारांच्या अंदाजानुसार प्रस्तुत रस्त्यास रुपये १५,०९४ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

सदर प्रकल्पास केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाकडून मान्यता मिळाल्यानंतर प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात येणार आहे.

---

### राज्यातील वक्फ बोर्डात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२६) २३९८७ (१६-१२-२०१६). श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, अॅड.निरंजन डावखरे, श्री.आनंद ठाकूर, श्री.रामराव वडकुते :** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वक्फ बोर्डात रुपये ९९ लाखांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ च्या दुसऱ्या सप्ताहात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार सदर गैरव्यवहारास जबाबदार असणाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-०२-२०१७) :** (१) अंशतः खरे आहे. महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या बळकटीकरणासाठी शासनाने मंजूर केलेल्या सहाय्यक अनुदानातून २०११-१२ या आर्थिक वर्षात रुपये ३.८६ कोटी इतके अनुदान वक्फ मंडळाला वितरीत करण्यात आले होते. सदर अनुदानातून सुमारे रुपये ९९ लाख इतक्या किंमतीच्या इतर साहित्याबरोबर संगणक, झेरॉक्स, फॅक्स मशीन्स इत्यादी साहित्य खरेदी करण्यात आलेले आहेत.
(२) वक्फ मंडळाकडून करण्यात आलेल्या संगणक, फॅक्स मशीन इत्यादी खरेदीमध्ये गैरव्यवहार झाल्याची मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांच्याकडे दिनांक १०/२/२०१६ रोजी तक्रार प्राप्त झाली होती. त्यास अनुसरुन वक्फ मंडळाने सदर प्रकरणी चौकशी करण्यासाठी चार सदस्यांचा समावेश असलेल्या समितीची नियुक्ती केली

होती. सदर समितीने केलेल्या चौकशीत काही अनियमितता घडल्याचे निष्पन्न झाल्याचे वक्फ मंडळाने शासनास कळविले होते. त्यास अनुसरुन सदर अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांविरुध्द संबंधित पोलीस ठाण्यात FIR दाखल करण्याविषयी वक्फ मंडळाला सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार वक्फ मंडळाने सदर अनियमिततेस जबाबदार असणारे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री.एन.डी.पठाण आणि स्वीय सहाय्यक श्री.इफ्तेखारऊल्ला बेग यांच्याविरुध्द छावणी पोलीस ठाणे, औरंगाबाद येथे FIR क्र.८३/२०१६ दाखल करण्यात आला आहे. तसेच याबाबत मा.जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद येथे प्र.क्र. ३६०/२०१६ दाखल करण्यात आले असून मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे जनहित याचिका क्र.१०४/२०१६ दाखल करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वांद्रे (मुंबई) येथील रहेजा स्कूल ऑफ आर्ट महाविद्यालयातील**
**विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्काची रक्कम परत करण्याबाबत**

**(२७) २४२५९ (१६-१२-२०१६) श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांद्रे (मुंबई) येथील रहेजा स्कूल ऑफ आर्ट महाविद्यालयाने शैक्षणिक शुल्काच्या नावाखाली आकारलेली जादा रक्कम परत करण्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रशासनाकडे वारंवार मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वांद्रे (मुंबई) येथील रहेजा स्कूल ऑफ आर्ट महाविद्यालयाचे प्रशासन जादा आकारलेले शुल्क परत करत नसल्याच्या निषेधार्थ विद्यार्थ्यांनी मंत्रालयासमोर दिनांक २४ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आंदोलन करणाऱ्या १८ ते २० वयोगटातील विद्यार्थ्यांना पोलीस उपायुक्त श्री.मनोजकुमार शर्मा यांनी बुक्क्यांनी मारहाण केल्यामुळे पोलिसांनी विद्यार्थ्यांच्या केसांना पकडून पोलीस व्हॅनमध्ये टाकले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०५-०३-२०१७) :** (१) होय,

(२) होय,

(३) नाही,

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात रॉकेलचा काळाबाजार करणाऱ्यांवर कार्यवाही करणेबाबत**

**(२८) २४४५८ (१६-१२-२०१६) श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१४-१५ या वर्षी शासनाकडून किती लिटर केरोसिनचे वाटप करण्यात आले व सन २०१५-१६ या वर्षात दुकानदाराकडून किती लिटर रॉकेलचे वाटप करण्यात आले,

(२) असल्यास, राज्यातील अधिकाऱ्यांनी रॉकेलच्या किती तपासण्या केल्या व किती लिटर रॉकेल जप्त केले, तसेच दोन वर्षात गैरवापर करणाऱ्या किती दुकानदारांवर कारवाई केली व किती दंड वसुल करण्यात आला आहे,

(३) असल्यास, बीपीएल व एपीएल धारकांना राज्यात किती रॉकेलची आवश्यकता आहे ?

**श्री. गिरीश बापट (०१-०३-२०१७) :** (१) सन २०१४-१५ व सन २०१५-१६ या कालावधीत एकूण ८१५५०२ कि.ली. व ७४९९०१ इतके कि.ली. केरोसिन वाटप करण्यात आले आहे.

(२) राज्यात सन २०१४-१५ व सन २०१५-१६ या कालावधीत केरोसिन परवानाधारकांच्या एकूण १,१२,२८५ इतक्या तपासण्या करण्यात आल्या. ७५,७९६ लिटर केरोसिन जप्त करण्यात आले. १४०२ किरकोळ केरोसिन परवानाधारकांवर कारवाई करण्यात आली असून रुपये ११६८०७५९/- इतका दंड वसूल करण्यात आला.

(३) केरोसिनचे वितरण बीपीएल, एपीएल शिधापत्रिकेनुसार करण्यात येत नसून शासन निर्णय दिनांक २०/०८/२०१५ अन्वये निश्चित केलेल्या परिणामानुसार बिगर गॅस जोडणी शिधापत्रिकाधारकांना केरोसिन वितरित करण्यात येते. राज्यातील गॅस जोडण्यांची संख्या विचारात घेता केंद्र शासनाने जानेवारी ते मार्च, २०१७ या तिमाहीकरीता १३६८०० कि.ली. केरोसिन कोटा मंजूर केला आहे.

---

**नागपूर येथे अल्पवयीन गुन्हेगारांच्या प्रमाणात होत असलेली वाढ**

**(२९) २४४५९ (०४-०१-२०१७) श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किशोरवयीन मुलांमध्ये झोपडपट्टी दादा विषयी निर्माण होणारे आकर्षण गरीबी व स्वार्थासाठी सराईत गुन्हेगारांचा होणारा वापर यामध्ये सन २०१४ मध्ये २०४ अल्पवयीन मुले, सन २०१५ मध्ये २२१ मुले तर सन २०१६ मध्ये ८१ मुलांवर गंभीर गुन्हे नागपूर येथे दाखल करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अल्पवयीन मुलांना चांगले संस्कार देण्यास शासन काही ठोस उपाययोजना तयार करणार आहे काय,

(३) असल्यास, अल्पवयीन मुलांना हुक्का पेन्स, हुक्का पार्लर व दारु, गांजा, अफिम व अन्य अंमली पदार्थांच्या व्यसनापासून परावृत्त करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०२-२०१७) :** (१) नागपूर शहर पोलीस आयुक्तालयाच्या अंतर्गत विविध पोलीस स्टेशन हद्दीत अल्पवयीन मुलांवर सन २०१४ मध्ये ३२०, सन २०१५ मध्ये ४६३, सन २०१६ मध्ये ३०५ गुन्हे दाखल आहेत.

(२) अल्पवनीय मुलांना चांगले संस्कार मिळण्याकरिता बाल मजूर कायदा अंतर्गत कोठेही काम करण्यास प्रतिबंध करण्यात येत असून त्यांना शिक्षित करण्यास लक्ष देण्यात येते. अल्पवयीन मुलांकरिता शैक्षणिक व कल्याणकारी योजना राबविण्यात येते. तसेच विविध स्वयंसेवी संस्थेतर्फे मुलांचे संगोपन व संवर्धन करीता कार्य केले जाते.

(३) अल्पवनीय मुलांना हुक्का पेन्स, हुक्का पार्लर तसेच दारु, गांजा, अफिम व अन्य अंमली पदार्थ याचे सेवन करु नये याकरिता विविध योजना राबवून त्यापासून अशा सवयीपासून दुर ठेवण्यात येते तसेच अशा अवैध धंद्यावर छापे घालून कार्यवाही करण्यात येते.

अल्पवयीनच्या अडीअडचणी जाणून त्यांना जागरुक करणे, त्यांच्या परिवाराला जागरुक करणे, व्यसनाचे दुष्परिणामाबाबत मोहल्ला समिती व शांतता समितीच्या बैठकीमध्ये पालकांना मार्गदर्शन करुन जागरुक करणे, वेळोवेळी सभा घेवून विद्यार्थ्यांना गुन्ह्याबाबत व कायद्याचे ज्ञान देवून मार्गदर्शन करण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी महानगरपालिका हदीतील एलबीटी एजन्सी रद्द करणेबाबत**

**(३०) २४५२२ (०४-०१-२०१७) श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी महानगरपालिका हदीतील एलबीटी एजन्सी रद्द करावी व इतर मागण्यांसाठी शहरातील व्यापाऱ्यांनी माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान बाजारपेठ बंद ठेवून निषेध नोंदविला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, व्यापाऱ्यांनी केलेल्या विविध मागण्यासंदंर्भात शासनस्तरावरून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०३-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) स्थानिक संस्था कराबाबत आढावा घेण्याचे काम पूर्ण होईपर्यंत कोणतीही नवीन एजन्सी नेमण्यात येऊ नये तसेच सदर एजन्सीने केलेल्या स्थानिक संस्था कराच्या निर्धारणानुसार करावयाच्या वसुलीसही पुढील आदेशापर्यंत स्थगिती देण्याबाबत आयुक्त, परभणी महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शेलू-शेंदूरसेनी आणि काठोडा (ता. आर्णी, जि.यवतमाळ)**
**येथे मंजूरीत अनियमितता झाल्याबाबत**

**(३१) २४७११ (१६-१२-२०१६) श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेलू-शेंदूरसेनी आणि काठोडा (ता.आर्णी, जि.यवतमाळ) या आर्णी पंचायत समितीतील ग्रामपंचायतींना रोहयोतून रोपवाटिकेसाठी सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाकरिता रुपये २५ लाखाच्या मर्यादेतील कामांना तांत्रिक मंजूरी देण्याचे अधिकार असताना तत्कालीन बीडीओ व कृषी अधिकाऱ्याने एक कोटीची देयके काढल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आर्णी पंचायत समिती, गट सचिवाने अधिकार नसताना उमरी पठार ते देगाव डॅम पांदण रस्त्यासाठी रुपये २८ लाख ८० हजाराची तांत्रिक मंजूरी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्या अधिकारावर अतिक्रमण केलेल्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (२०-०२-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

ग्रामपंचायत उमरी अंतर्गत उमरी (प) ते देवगाव पांधण रस्ता या कामांना वित्तीय मर्यादा रुपये २५.०० लक्षपेक्षा जास्त रकमेच्या कामांना तांत्रिक व प्रशासकीय मान्यता दिल्याचे निदर्शनास आले. परंतु वित्तीय मर्यादेच्या अधिन राहून रुपये १४.५३ लक्ष खर्च करण्यात आला आहे.

(३) उपरोक्त प्रकरणी ग.वि.अ.पं.स. आर्णी यांचेमार्फत चौकशी करण्यात आली असून त्यांचा चौकशी अहवाल दिनांक २/९/२०१६ अन्वये सादर केलेल्या अहवालानुसार उपरोक्त कामांना मान्यता देताना शासन परिपत्रक दिनांक ३ ऑगस्ट, २०११ चे अवलोकन केले नसल्याबाबत नमुद केल्यानुसार तत्कालीन कृषी अधिकारी, पंचायत समिती, आर्णी यांचेविरुध्द महाराष्ट्र शिस्त व अपील नियम १९६४ अन्वये विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे. तसेच शाखा अभियंता, पंचायत समिती, आर्णी यांनी उमरी पठार ते देवगांव पांदन रस्ता या कामाला दिलेल्या तांत्रिक मान्यतेच्या संदर्भात उपअभियंता जिल्हा परिषद, बांधकाम उपविभाग, द्वारव्हा यांचेमार्फत चौकशी सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भांबोरा (ता.कर्जत, जि.अहमदनगर) येथे विद्यार्थीनीचा विनयभंग केल्याबाबत**

**(३२) २४७२३ (०४-०१-२०१७) श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोपर्डी (ता.कर्जत, जि.अहमदनगर) येथे नुकतीच अत्याचाराची घटना घडलेली असताना याच तालुक्यातील भांबोरा गावात एका शाळकरी मुलीची भर रस्त्यात छेड काढण्यात आली असल्याचे माहे जुलै, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानंतर कारवाईसाठी आलेल्या पोलिसांपैकी काही पोलीस मद्यपान करुन आल्याचे आढळल्यानंतर संतप्त ग्रामस्थांनी तीन आरोपींसह तिघा पोलिसांनाही ग्रामपंचायत कार्यालयात कोंडून ठेवले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदरहू मुलीची छेड काढून विनयभंग करणाऱ्यांविरुध्द व या प्रकरणातील मद्यपी पोलिसांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०३-२०१७) :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

ग्रामस्थांनी तीन आरोपीसह तीन पोलीस व एक पोलीस मित्र यांना ग्रामपंचायत कार्यालयात कोंडून ठेवले होते. परंतु पोलिसांनी मद्यपान केलेले नव्हते. वैद्यकीय अधिकारी व प्रादेशिक न्यायसहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, नाशिक यांच्याकडील मद्यपान परिक्षण दाखल्यामध्ये पोलिसांनी मद्यपान केले नसल्याचे नमूद केले आहे.

(३) फिर्याद मुलीची छेड काढून विनयभंग केल्याप्रकरणी दिलेल्या फिर्यादीवरुन कर्जत पोलीस स्टेशन गुरनं. I १८३/२०१६ भादंवि कलम ३५४, ५०६(२), ३४ व बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण अधिनियम कलम ७, ८, ११(४), १२ प्रमाणे दिनांक ३०/७/२०१६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दिनांक १/८/२०१६ रोजी सदर गुन्ह्यास भादंवि कलम ३५४(अ), ३५४(ब) ही वाढीव कलमे लावण्यात आली आहेत. गुन्ह्यातील आरोपी क्र.१ व ५ यांना अटक करण्यात आले आहे. आरोपी क्र. २, ३, ४ (विधी संघर्षीत बालक) यांना मा.बाल न्यायालयात हजर केले आहे. आरोपीविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे.

भांबोरा गावात जमलेल्या ग्रामस्थांच्या मागणीनुसार व भांबोरा गावातील कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने पोलीस कर्मचारी यांची तात्काळ मद्यपान परिक्षण तपासणी करुन त्यांना दिनांक २९/७/२०१६ रोजी निलंबित करण्यात आले होते. मद्यपान केले नसल्याबाबत अहवाल प्राप्त झाल्यानंतर सदर पोलीस कर्मचारी यांना दिनांक ७/९/२०१६ रोजी निलंबनातून मुक्त केले आहे.

पोलीस कर्मचारी यांना ग्रामस्थानी कोंडून ठेवल्याच्या घटनेच्या घटनेबाबत कर्जत पोलीस स्टेशनला गु.र.नं. I १८५/२०१६ भादंवि कलम ३५३, ३३२, ३४१, ३४२, १४३, १४७, १४८, १४९ सार्वजनिक मालमत्ता संपत्ती नुकसान प्रतिबंधक कायदा कलम ६, ७ व महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (१)(३)/१३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

### भायखळा (मुंबई) येथील कारागृहातून महिला कैद्याने पलायन केल्याबाबत

**(३३) २४७५३ (०४-०१-२०१७). आर्कि. अनंत गाडगीळ, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भायखळा (मुंबई) येथील कारागृहात शिक्षा भोगत असलेल्या महिला कैद्याने पोलिसांदेखत आजारी मुलीसह पलायन केले असून महिला कैद्यावर पहारा ठेवण्यासाठी तैनात करण्यात आलेल्या दोन्ही महिला हवालदार मोबाईलवर गेम खेळण्यात मग्न असल्याचे निष्पन्न झाल्यावर त्यांच्यावर कारवाई करण्यात आली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीस कर्मचाऱ्यांकडून होत असलेल्या मोबाईलचा अवाजवी वापर यामुळे त्यांच्या कामावर परिणाम होत असल्याचे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या पहाणीत आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या पार्श्वभूमीवर पोलीस कर्मचाऱ्यांच्या मोबाईल वापरावर नियंत्रण आणण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१७) :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना कर्तव्यावर असताना मोबाईलचा वापर अत्यावश्यक वेळेशिवाय करु नये अशाप्रकारच्या सूचना सातत्याने देण्यात येत असतात व त्याची अंमलबजावणी होत असल्याची वेळोवेळी पडताळणी करण्यात येते.

(३) पोलीस कर्मचाऱ्यांच्या मोबाईल वापराबाबत यापूर्वी वरिष्ठांनी वेळोवेळी परिपत्रक काढून दिलेल्या सूचनांची तंतोतंत अंमलबजावणी करण्याचे आदेश सर्व पोलीस ठाण्यांना देण्यात आलेल्या आहेत.

(४) विलंब नाही.

---

### राज्यातील आदिवासी पाड्यांच्या विकासाबाबत

**(३४) २४७८६ (०४-०१-२०१६) श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाला केंद्र शासनाकडून आदिवासी पाड्यांचा विकास करण्यासाठी रुपये ३६ कोटीचा निधी प्राप्त झाला असून स्मार्ट सिटीच्या धर्तीवर राज्यातील आदिवासी स्मार्ट गाव करण्याच्या दृष्टीने पुणे, पालघर, गडचिरोली येथील एक हजार आदिवासी गावांची निवड करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०४-०३-२०१७) :** (१) अंशतः खरे आहे.

केंद्र शासनाकडून Climate smart Village या योजनेंतर्गत एकूण रुपये २८५०.०० लक्ष निधी प्राप्त झाला आहे व या योजनेंतर्गत पुणे, पालघर व गडचिरोली जिल्ह्यातील एक हजार गावांची निवड करण्यात आली आहे.

(२) या योजनेची अंमलबजावणी बोरलॉग इन्स्टीट्युट ऑफ साऊथ एशिया व आयुक्त, आदिवासी विकास नाशिक यांचेमार्फत या एक हजार गावांमध्ये सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील कामगार कल्याण मंडळाने अनधिकृत बांधकामे केल्याबाबत**

**(३५) २४७९५ (०४-०१-२०१७) श्री.अमरिशभाई पटेल, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कामगार कल्याण मंडळाने राज्यात १९ ठिकाणी अनधिकृत बांधकामे केल्याचे माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदरील प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०२-०३-२०१७) :** (१) होय.

(२) दिनांक १८/०२/२०१७ रोजी उपरोक्त नमूद कामांची चौकशी करण्यासाठी कामगार आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**औरंगाबाद येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने दिलेल्या जाहिरातीबाबत**

**(३६) २५१९८ (१६-१२-२०१६) श्री.सतिश चव्हाण, श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने दिनांक १ जुलै, २०१६ रोजी प्राध्यापक भरतीची जाहिरात काढली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पदार्थ विज्ञान विषयाचे अभ्यासक्रमांत जे स्पेसिफीकेशन पाहिजे त्या व्यतिरिक्त असणाऱ्या स्पेसिफिकेशन नुसार जाहिरात काढल्याने सहाय्यक व सहयोगी प्राध्यापकांवर अन्याय होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर जाहिरात रद्द करुन विद्यापीठात शिकवल्या जाणाऱ्या स्पेसिफिकेशन नुसार जाहिरात काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०४-०३-२०१७) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने सन २०१३ मध्ये दिलेली जाहिरात रद्द करुन त्याऐवजी दिनांक ०१/०७/२०१६ रोजी दिलेल्या जाहिरातीमध्ये इतर विषयासह पदार्थ विज्ञान विभागासाठी सहयोगी प्राध्यापकाच्या २ व सहाय्यक प्राध्यापकाच्या २ पदांचा समावेश आहे.

दिनांक ०७/०१/२०१६ रोजी दिलेल्या जाहिरातीमध्ये सन २०१३ च्या जाहिरातीत नमूद पदार्थ विज्ञान विषयाच्या स्पेशलायझेशन मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. सदर सुधारणा करताना विद्यापीठाचे कुलगुरु व व्यवस्थापन परिषदेने विद्यापीठाच्या गुणवत्ता वाढीचा विचार केलेला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली मार्केट यार्डातील हमालांची माहिती (डाटा) नष्ट झाल्याची घटना**

**(३७) २५६३१ (०४-०१-२०१७) डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली येथील मार्केट यार्डातील असंख्य हमालांचा पगार, प्रॉव्हिडंड फंड, बोनस यासह सर्व बाबींची माहिती (डाटा) माथाडी बोर्डातील एका कर्मचा-याच्या हलगर्जीपणामुळे नष्ट झाल्याने दोषी कर्मचा-यावर कारवाई करण्याच्या मागणी करिता दिनांक ६ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास माथाडी कामगारांनी आंदोलन केले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार संबधित कर्मचा-यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०९-०३-२०१७) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) यासंदर्भात सांगली माथाडी मंडळाकडून प्राथमिक चौकशी करण्यात आली असून, संगणक प्रणालीत डाटा बॅकअपची व्यवस्था/सोय असल्याने, दिनांक ३/९/२०१६ पूर्वीच्या कालावधीचा करप्ट झालेला डाटा त्वरीत पूर्ववत (Restore) करण्यात आला असून, कोणतेही नुकसान झाले नाही. तथापि, सांगली माथाडी मंडळाचे अध्यक्षांनी पोलीस निरीक्षक, विश्रामबाग, सांगली यांना दिनांक ८/१०/२०१६ रोजीच्या पत्रान्वये याबाबत चौकशी करुन, संबंधितांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याबाबत कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या कुलगुरूंचा शैक्षणिक माहितीचा नमुना विद्यापीठाकडे उपलब्ध नसल्याबाबत**

**(३८) २५६६० (१६-१२-२०१६) श्री.अनिल भोसले, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.ख्वाजा बेग :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे मागील साडेचार वर्षापासून असलेल्या कुलगुरूंचा शैक्षणिक माहितीचा नमुना विद्यापीठाकडे उपलब्ध नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, विद्यापीठाचे कुलगुरू या उच्च पदावर असलेल्या व्यक्तीची शैक्षणिक माहिती न ठेवणाऱ्या प्रशासनावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०५-०३-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आदिवासी विभागाच्या शाळांमधील बी.एड अर्हता धारक शिक्षकांना डी.एड. ची वेतनश्रेणी देण्याबाबत**

**(३९) २५७५६ (१६-१२-२०१६) डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राथमिक शाळांमधील बी.एड. अर्हता धारक शिक्षकांना प्रशिक्षित समजून त्यांना डी.एड.ची वेतनश्रेणी देण्याबाबतच्या प्रस्तावासंदर्भातील माहिती वित्त विभागाला उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही पुर्ण झाली आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त संदर्भातील दिनांक ११ नोव्हेंबर, २०११ चा शालेय शिक्षण विभागाचा शासन निर्णय आदिवासी विकास विभागाला लागू करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०१-०३-२०१७) :** (१) व (२) आदिवासी विकास विभागातील अनुदानित आश्रमशाळांमधील बी.एड. पदवीधर अप्रशिक्षित शिक्षकांना शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक ११/११/२०११ च्या शासन निर्णयाच्या धर्तीवर डी.एड. प्रशिक्षित शिक्षकांची वेतनश्रेणी लागू करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

वित्त विभागाने शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक ११/११/२०११ च्या शासन निर्णयाशी व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक २८/४/२०१४ च्या शासन निर्णयाशी संबंधित नस्त्या अवलोकनार्थ सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्याची पुर्तता करण्यासाठी संबंधित विभागांना विनंती करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायतीच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नविन पारिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू करण्याबाबत**

**(४०) २५७६८ (०४-०१-२०१७) डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक २१५४१ ला दिनांक २० जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायतीच्या कर्मचाऱ्यांना आणि याअंतर्गत सेवेत असलेल्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नविन परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू करण्याच्या तपासणीसंदर्भात शासनस्तरावरून सुरु असलेली कार्यवाही पुर्ण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०२-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) नवीन पारिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना महानगरपालिका, नगरपरिषदा, नगरपंचायतीच्या कर्मचाऱ्यांना लागू करण्याबाबतची बाब तपासण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नाशिक येथे सहाय्यक निबंधक भागीदारी संस्थेचे कार्यालय सुरु करण्याबाबत

**(४१) २५७६९ (०४-०१-२०१७) डॉ.अपूर्व हिरे : दिनांक ३ ऑगस्ट, २०१६ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ३ मधील प्रश्न क्रमांक १८६१६ ला दिलेल्या उत्तराच्या सदंर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) निबंधक भागीदारी संस्था यांचे अभिप्रायानुसार निबंधक भागीदारी संस्था, मुंबई यांचे कार्यक्षेत्रातील नाशिक, धुळे, नंदुरबार व जालना हे जिल्हे सहाय्यक निबंधक भागीदारी संस्था, औरंगाबाद या कार्यालयाच्या कार्यकक्षेत वर्ग करण्याचा निर्णय विधी व न्याय विभागाच्या शासन निर्णय क्र.निभासं-१२१४/११०/(४८/१४)/का.१७, दिनांक ३/१२/२०१५ अन्वये घेण्यात आला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरीलप्रमाणे जिल्ह्याचे वर्गीकरण "भौगोलिकदृष्टीने नजीक असलेले" या निकषानुसार करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नाशिक, धुळे, नंदुरबार या जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणाचे वा जिल्ह्यातील शेवटच्या टोकावरील गावाचे औरंगाबाद पासूनचे मोठे अंतर पाहता तसेच नाशिक महानगराचे मुंबई-पुणे-नाशिक सुवर्ण त्रिकोणातील असलेले महत्व विचारात घेता शासनाच्या पुर्ववती विचाराधीन असलेल्या प्रस्तावानुसार नाशिक येथेच निबंधक भागीदारी संस्था कार्यालय सुरु करणेबाबत शासनाकडून पुनर्विचार करण्यात येणार आहे काय,
(४) असल्यास, स्थानिक लोकप्रतिनिधी व नाशिक जिल्ह्यातील जनतेच्या सोईच्या दृष्टीकोनातून करण्यात येणाऱ्या मागणीबाबत शासनाचे धोरण काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०२-२०१७) :** (१) होय,
(२) होय.
तसेच मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाच्या कार्यक्षेत्रानुसार
(३) सध्या पुनर्विचाराचा प्रस्ताव नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### किमान किंमती राखण्याच्या चीनच्या पध्दतीचे अनुसरण करण्याबाबत

**(४२) २५८४१ (१६-१२-२०१६) श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.संजय दत्त, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात आंतरराष्ट्रीय दर्जाचे उत्पादन घेऊन किमान किंमती राखण्याच्या चीनच्या पध्दतीचे अनुसरण भारतीय कंपन्यांनी करायला हवे, असे प्रतिपादन मा.उद्योग मंत्री यांनी केले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच चीनच्या पध्दतीचे अनुसरण किती कंपन्यांनी केले आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२०-०२-२०१७) :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**येडशी (उस्मानाबाद) येथे पाणीपुरवठा योजना राबविण्याबाबत**

**(४३) २५८८१ (१६-१२-२०१६) श्री.सुजितसिंह ठाकूर :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येडशी (जि. उस्मानाबाद) येथील गावासाठी चोराखळी तलावातून पाणीपुरवठा करणाऱ्या योजनेला प्रशासकीय मंजूरी मिळून निधी व अंदाजपत्रिकेची तरतूद होऊनही अदयापी योजना कार्यान्वित झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजनेवर अंमलबजावणी करण्यास विलंब होत असल्याने येडशी गावात भीषण पाणी टंचाई निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२७-०२-२०१७) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत मौ.येडशी गावाकरिता स्वतंत्र नळ पाणीपुरवठा योजना राबविण्याचे प्रस्तावित होते. परंतु येडशी गावाचा सदर कार्यक्रमांतर्गत पुनरुज्जीवित करावयाच्या मौ.ढोकी व ४ गांवे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेत समावेश असल्याने सदर गावाकरिता स्वतंत्र योजना राबविण्याची आवश्यकता नसल्याचे अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे अध्यक्षतेखालील व्यवहार्यता तपासणी समितीने कळविले आहे.
(४) मौ.ढोकी व ४ गांवे प्रादेशिक पाणीपुरवठा योजना पुनरुज्जीवित करणेकरिता आवश्यक असलेले ग्रामसभेचे ठराव प्राप्त होत नसल्याने योजना पुनरुज्जीवित करण्यास विलंब होत आहे.

---

**अकोला शहरालगत असलेल्या गीतानगर-गंगानगर येथील प्रस्तावित पेट्रोलपंपाबाबत**

**(४४) २६०३२ (०४-०१-२०१७) श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला शहरालगत असलेल्या गीतानगर-गंगानगर येथील स्मशानभूमीच्या बाजूला पेट्रोलपंपाकरिता परवानगी देण्याचे प्रस्तावित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पेट्रोल पंपाकरिता प्रथम पोलीस अधिक्षकांनी ना हरकत प्रमाणपत्र नाकारले तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाने देखील ना-हरकत प्रमाणपत्र नाकारले होते परंतु, त्यानंतर परत पोलीस अधिक्षकांकडे ना-हरकत प्रमाणपत्राकरिता मागणी करण्यात आली असतांना पोलीस अधिक्षकांनी स्मशानभूमीकडील पेट्रोल पंपाकरिता ना हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू ना हरकत प्रमाणपत्र मिळविण्याकरिता प्रशासनाची व महानगरपालिकेची दिशाभूल करुन खोटी कागदपत्रे सादर करण्यात आलेली आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रथम ना हरकत प्रमाणपत्र नाकारलेले असतांनाही व शासनाच्या सर्व नियम व अटी व शर्तीचे उल्लंघन करूनही पोलीस अधिक्षकांनी उक्त ना हरकत प्रमाणपत्र देण्यामागची व शासनाच्या प्रचलित नियमानुसार शाळा, मंदिर, स्मशानभूमी या भागापासून पेट्रोलपंप दूर ठेवण्याबाबत शासन निर्णय असतांनाही त्याकडे दुर्लक्ष करून पेट्रोलपंपास ना हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०२-२०१७) :** (१) आयुक्त, अकोला महानगरपालिका यांच्या अहवालानुसार सदरची वस्तुस्थिती खरी आहे.
(२) पोलीस अधिक्षकांनी प्रथम प्रश्नाधीन पेट्रोलपंपाकरिता ना हरकत प्रमाणपत्र नाकारले होते. परंतु अर्जदाराने केलेल्या विनंती अर्जानुसार पोलीस अधिक्षक अकोला यांना पुर्नअभिप्राय सादर करण्याबाबत ना हरकत प्रमाणपत्रा करिता मागणी करण्यात आली असताना पोलीस अधिकक्षकांनी सदर पेट्रोलपंपाकरिता नाहरकत प्रमाणपत्र दिलेले आहे हे खरे आहे.

मात्र, सार्वजनिक बांधकाम विभागाने ना हरकत प्रमाणपत्र नाकारले नसून, पेट्रोलपंप धारकास परवाना देण्याअगोदर संबंधितांस पेट्रोलपंपाच्या जोड रस्त्याचा प्रस्ताव सादर करण्यास कळविणे बाबत अभिप्राय सादर केले होते.
(३) अर्जदाराच्या सादर कागदपत्रानुसार व संबंधित विभागाच्या ना हरकत प्रमाणपत्राच्या आधारे प्रश्नाधीन पेट्रोलपंपाकरिता जिल्हाधिकारी, अकोला यांनी ना हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. त्यामुळे प्रशासनाची दिशाभूल करण्यात आली, ही बाब खरी नाही. असे जिल्हाधिकारी, अकोला यांच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.
(४) व (५) पोलीस अधिक्षक यांच्या सुधारित अहवालानुसार, प्रश्नाधीन नियोजित पेट्रोलपंपाच्या जागेपासून, ९१.५ मीटर पर्यंत कोणतेही जक्शंन अथवा चौक, शाळा, हॉस्पिटल, सिनेमा थियेटर, स्टेडीयम अथवा एकत्र येण्याची जागा नाही व पेट्रोलियम पदार्थ साठवणुकीकरिता रिटेल आऊटलेट स्थापन करण्याकरिता परवानगी देण्यास हरकत नसल्याचे अभिप्राय सादर केल्यानुसार तसेच तहसिलदार अकोला यांच्या अहवालानुसार, प्रस्तावित पेट्रोलपंपापासून अंदाजे ७५ मीटर अंतरावर स्मशानभूमीची आवारभिंत असल्याचे कळविल्यानुसार, नियोजित पेट्रोलपंपाकरिता जिल्हाधिकारी अकोला यांनी ना हरकत प्रमाणपत्र दिलेले आहे. सबब, शासन निर्णयानुसार कोणत्याही बाबीकडे दुर्लक्ष झाले आहे ही बाब खरी नाही, असे जिल्हाधिकारी, अकोला यांच्या अहवालात नमूद करण्यात आलेले आहे.

---

**राज्यातील औद्यगिक प्रशिक्षण संस्थेत प्रशिक्षणार्थी उमेदवारांना गुणवत्तेनुरूप संधी देणेबाबत**

**(४५) २६०४५ (०४-०१-२०१७) श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.दत्तात्रय सावंत :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्रत्येक तालुक्यात उपलब्ध असलेल्या औद्योगिक प्रशिक्षण केंद्रात सर्व ट्रेडच्या प्रशिक्षणाची व्यवस्था आहे काय,

(२) असल्यास, तालुक्यांतर्गत औद्यगिक प्रशिक्षण संस्थेतच प्रथमत: प्रवेश घेण्याचे बंधन प्रशिक्षणार्थीवर घालणे योग्य ठरेल काय,

(३) असल्यास, औद्यगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रवेश प्रथमत: तालुक्यातील प्रशिक्षणार्थीसाठी राखून ठेवणारे व संधीला मर्यादा घालणारे शासनाने आदेश दिले आहेत काय,

(४) असल्यास, गुणवतेनुरूप संधी देण्यास नकार देणारा सदरचा शासनादेश शासन मागे घेणार आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०२-०३-२०१७) :** (१) होय, शासनाच्या धोरणात्मक निर्णयानुसार राज्यातील एकूण ३५९ तालुक्यात ४१७ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था कार्यान्वित असून, या संस्थांमध्ये शासन मान्य तुकड्यांसाठी प्रशिक्षण व्यवस्था निर्माण केल्यावर डीजीटी, नवी दिल्ली यांची संलग्नता प्राप्त करुन त्या सर्व तुकड्यांमध्ये प्रशिक्षणार्थी सद्य:स्थितीत प्रशिक्षण घेत आहेत.

(२) नाही.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**खटाव (जि.सातारा) तालुक्यातील रस्त्यांची व पुलांची दुरवस्था झाल्याबाबत**

**(४६) २६०८६ (३०-१२-२०१६) श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खटाव (जि.सातारा) तालुक्यातील औंध भागातील अनेक रस्त्यांची व पुलांची दुरवस्था झाली असून नादुरुस्त पुलांवर वारंवार घडणाऱ्या अपघातानंतर शासनाकडे प्रस्ताव पाठवूनही निधी मिळत नसल्याचे तसेच तालुक्यातील मल्हारपेठ-पंढरपूर राज्य मार्गाची दुरवस्था झाली असणे, रायगाव कारखाना ते चोराडे या २ कि.मी. अंतराच्या रस्त्याचे रुंदीकरण झालेले नसणे, वडूज या तालुक्याच्या ठिकाणाला जोडणाऱ्या सर्व मुख्य जिल्हा मार्गावर मोठे खड्डे पडले असल्याचे अनुक्रमे माहे जुलै, २०१६ व ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार उपरोक्त रस्त्यांची व पुलांची दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२७-०२-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.

खटाव (जि.सातारा) तालुक्यात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित सुमारे ४२५ कि.मी. लांबीचे रस्ते आहेत. या रस्त्यांच्या लांबीपैकी काही रस्ते काही लांबीत क्षतिग्रस्त झाले होते. डांबरी पृष्ठभागावरील खड्डे भरुन रस्ते सुस्थितीत ठेवण्यात आले आहेत. रस्त्यावरुन वाहतूक सुरळीत चालू आहे. या रस्त्यावरील पूल सुस्थितीत आहेत. काही पूलांसाठी किरकोळ दुरुस्तीची कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

मल्हारपेठ-पंढरपूर रस्ताही वाहतूकीसाठी सुस्थितीत असून रस्त्याच्या डांबरीपृष्ठभागाचे मजबूतीकरण व डांबरीकरण करण्याचे ३ कि.मी. लांबीचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

रायगाव कारखाना ते चोराडे या ३ कि.मी. लांबीतील रुंदीकरणाचे काम शासनाच्या विविध योजनांमधून मंजूरी, निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.
(२) व (३) तालुक्यातील सर्व रस्त्यांच्या डांबरी पृष्ठभागावरील खड्डे डांबरमिश्रित खडीत भरण्यात आले आहेत. वाहतूक सुरळीत चालू आहे. रस्ते व पुलांची काही आवश्यक मजबूतीकरण / नुतनीकरण / रूंदीकरणाची कामे मंजूरी, निधी, निकष व प्राध्यान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

---

**नागपूर-भंडारा-गोंदिया भागातील, वळण रस्त्याच्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत**

**(४७) २६११० (३०-१२-२०१६) श्री.सुजितसिंह ठाकूर** : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर-भंडारा-गोंदिया भागातील सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे सन २००८-२०१० या कालावधीत वळण रस्ता बांधकाम गैरव्यवहार प्रकरणी चौकशी अहवालाच्या अनुषंगाने जबाबदार अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द दोषारोप सादर करण्याचे पत्र शासनाने मुख्य अभियंता, नागपूर यांना दिनांक १६ एप्रिल, २०१६ रोजी पाठविण्यात येवूनही मुख्य अभियंता यांनी कोणतीच कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०४-०३-२०१७) :** (१) व (२) मुख्य अभियंता, सा.बां. प्रादेशिक विभाग, नागपूर यांचेकडून दिनांक १७/१०/२०१६ रोजीच्या पत्रासोबत या प्रकरणी जबाबदार अधिकारी/ कर्मचारी यांचेविरुध्दची दोषारोपपत्रे प्राप्त झाली आहेत. प्रस्तुत प्रकरणी प्राप्त दोषारोपपत्रांची छाननी करुन, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२ च्या नियम २७ (२) (बी) (२) आणि विभागीय चौकशी नियमपुस्तिका, चौथी आवृत्ती, १९९१ नुसार तपासून, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम-१० नुसार संबंधितांविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्याचा प्रस्ताव शासन मान्यतेस्तव सादर करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील वक्फ बोर्डाच्या जमिनीचे बेकायदा हस्तांतरण झाल्याबाबत**

**(४८) २६११६ (१६-१२-२०१६) श्री.सुजितसिंह ठाकूर : तारांकित प्रश्न क्रमांक १९५३७ ला दिनांक १९ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **अल्पसंख्यांक विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वक्फ बोर्डाची अतिक्रमण झालेली ७० टक्के जमीन अतिक्रमण मुक्त करण्याकरिता न्या. ए.टी.ए.के. शेख यांच्या आयोगाने सादर केलेल्या अहवालात फक्त मुंबई शहरात १३० वफ्फ जमिनीचे बेकायदा हस्तांतरण झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने बेकायदा जमीन हस्तांतरणाची चौकशी करुन सदर जमीन ताब्यात घेणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०३-०३-२०१७) :** (१) नाही. ए.टी.ए.के.शेख चौकशी आयोगाने सादर केलेल्या अहवालातील मुंबई शहरातील १३० वक्फ जमिनीचे बेकायदा हस्तांतरण झाल्याविषयी उल्लेख नाही.

(२) महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या अधिपत्याखालील ज्या वक्फ मालमत्ता अतिक्रमणाखाली आहे त्या वक्फ मंडळाकडे पूर्ववत करण्याच्यादृष्टीने वक्फ अधिनियम, १९९५ मधील तरतुदीनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याविषयी शासन स्तरावरुन वक्फ मंडळाला वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या आहेत. शिवाय, वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४(६) येथील तरतुदीनुसार राज्यातील वक्फ मालमत्तांचे दुसरे सर्व्हेक्षण करण्यासाठी जमाबंदी आयुक्त यांची सर्व्हेक्षण आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आलेली असून राज्यातील वक्फ मालमत्ता सद्य:स्थितीत नेमक्या कोणाच्या ताब्यात आहेत व सदर ताबा कायदेशीर आहे किंवा कसे याबाबीची देखील सदर सर्व्हेक्षणात नोंद घेण्याबाबत निदेश देण्यात आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वसई, पालघर व डहाणू (जि.पालघर) या तालुक्यातील समुद्र किनाऱ्यांवर धूप प्रतिबंधक बंधारे बांधण्याबाबत**

**(४९) २६१८५ (३०-१२-२०१६) श्री.आनंद ठाकूर : तारांकित प्रश्न क्रमांक २२३६२ ला दिनांक २० जुलै, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई, पालघर व डहाणू (जि.पालघर) या तालुक्यातील समुद्र किनाऱ्यावर धूप प्रतिबंधक बंधारे बांधण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १३ ऑक्टोबर, २०१५ व दिनांक १८ नोव्हेंबर, २०१५ रोजीच्या पत्रान्वये अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे मागणी केली असताना सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात लेखाशीर्ष ४७११ (०२) धूप प्रतिबंधक बंधारे या अंतर्गत बाब क्र.५ अन्वये मंजूरी प्रदान करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आतापर्यंत उक्त तालुक्यातील गावांना किती रक्कमेची तरतूद करण्यात आली आहे,

(३) असल्यास, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०३-२०१७) :** (१) होय.
(२) उक्त तालुक्यांना सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात खाली नमूद केल्याप्रमाणे तरतूद करण्यात आली आहे -

| अ.क्र | तालुका | अंदाजित किंमत | सन २०१६-१७ साठी तरतूद |
|---|---|---|---|
| १) | वसई | रु. ३०० लक्ष | रु. ६५.२२ लक्ष |
| २) | पालघर | रु. १०५० लक्ष | रु. २२८.२७ लक्ष |
| ३) | डहाणू | रु. ५०० लक्ष | रु. १०८.७० लक्ष |
| ४) | एकूण | रु. १८५० लक्ष | रु. ४०२.११ लक्ष |

(३) उक्त नमूद कामांच्या निविदा प्रक्रिया सुरु असून पर्यावरण विभागाची परवानगी प्राप्त होताच सर्व कामे हाती घेऊन पूर्ण करण्यात येतील.

---

**खान्देशातील अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेत झालेले बदल केल्यामुळे एकूण जागांपैकी निम्म्या जागा रिक्त असल्याबाबत**

**(५०) २६३३३ (१६-१२-२०१६). श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेत बदल केल्यामुळे खान्देशातील एकूण जागांपैकी निम्म्या जागा रिक्त असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रवेश प्रक्रियेतील झालेले बदल क्लिष्ट असल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये गोंधळ निर्माण झाला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोणते बदल करण्यात आले व त्यामुळे विद्यार्थ्यांना कोणत्या अडचणी निर्माण झाल्या आहेत,
(४) असल्यास, याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (०६-०३-२०१७) :** (१) नाही.
(२) नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**उत्तमसिंग चव्हाण**
**सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण : शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.